# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे
# चिंचवड पोलीस स्टेशन
पत्ताः- कामत हॉस्पिटलच्या मागे, चापेकर चौक, चिंचवडगाव, पुणे - ४११ ०३३.
फोन नं. ०२०-२७३५६७६८, २७३५६७६७.
**E mail ID :-** pschinchwad.pcpc-mh@nic.in


## --// प्रेस नोट //--

दि. १४/०८/२०२३

## चिंचवड पोलीस स्टेशन

### अनोळखी इसमाचे खुनाचा गुन्हा १२ तासांचे आत उघडकीस आणण्यात चिंचवड पोलीसांना यश

### (चिंचवड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी )

--- ०० ---

दि. १२/०८/२०२३ रोजी सायं. १८/०० वा. सुमारास चिंचवड पोलीस स्टेशन येथे माहिती प्राप्त झाली की, क्विन्स टाऊन सोसायटी समोरील मोकळया मैदानातातील विहीरीमध्ये दुर्गंधी पसरलेली आहे. अशी माहिती मिळताच पोउनि, श्री. तलवाडे, श्री. रणवरे, पोउनि श्री. चव्हाण, महिला पोउनि, श्रीमती झडते व स्टाफ असे माहिती मिळालेल्या ठिकाणी गेले असता, सदर ठिकाणी एका विहीरीमध्ये एक अनोळखी पुरुष इसमाची बॉडी तरंगत असलेली दिसली. त्यानंतर तात्काळ फायरब्रिगेड, ॲम्ब्युलन्स, आयकार यांना पाचारण केले. त्यानंतर फायरब्रिगेडच्या मदतीने बॉडी बाहेर काढुन ससुन हॉस्पिटल येथे रवाना केले.

सदर अनोळखी इसमाची ओळख पटली नसल्याने मा. पोलीस उप-आयुक्त सो. परिमंडळ-१ श्री. विवेक पाटील, सपोआ, पिंपरी विभाग श्री. कसबे यांचे मार्गदर्शनाखाली चिंचवड तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी अनोळखी इसमाचा शोध घेणेकामी, पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील हरविलेल्या व्यक्तिंचा शोध घेत असताना पोउनि, श्री. तलवाडे, व श्री. रणवरे यांना गोपणीय बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, महिला नामे सुनिता भगवाण रोकडे, वय-४० वर्षे, रा. बौध्दनगर, पिंपरी, पुणे यांचा मुलगा नामे गणेश ऊर्फ दादया भगवान रोकडे, वय-१८ वर्षे, रा. सदर हा मागील ४-५ दिवसांपासुन मिसिंग आहे अशी माहिती मिळाल्याने तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर महिलेच्या घरी जावुन त्यांना मयत इसमाच्या बॉडीची फोटो व घटनास्थळावर मिळुन आलेल्या मयताचे वस्तुंचे फोटो दाखविले असता, सदर महिलेने मयताचे फोटो व कपडे पाहुन सदर मयत इसम हा त्यांचा मुलगा गणेश ऊर्फ दादया भगवान रोकडे, वय-१८ वर्षे, रा. बौध्दनगर, पिंपरी, पुणे हाच असल्याचे ओळखले. त्यानंतर तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीचे आधारे सदरचा गुन्हा हा विधीसंघर्षित बालक-XYZ व आरोपी नामे अभिषेक ऊर्फ डल्ल्या मसु गायकवाड, वय-२० वर्षे, रा. दळवीनगर झोपडपट्टी, चिंवड, पुणे यांनी दि. १०/०८/२०२३ रोजी ००/०० ते ०१/३० वा. चे दरम्यान घटनास्थळावर एकत्र दारु पित बसले असताना अचानक झालेल्या वादातुन मयत इसमाचा धारदार हत्याराने शरीरावर विविध ठिकाणी वार करुन खुन करुन, पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने मयताचे कपडे काढुन त्याला दगड बांधुन विहीरीमध्ये फेकुन दिले असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयातील विधीसंर्घषित बालकास ताब्यात घेण्यात आलेले असुन त्याने आरोपी नामे अभिषेक ऊर्फ डल्ल्या मसु गायकवाड, वय-२० वर्षे, रा. दळवीनगर झोपडपट्टी, चिंचवड, पुणे याचेसह वरील प्रमाणे गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. सदर विधीसंर्घषित बालक व आरोपीने यापुर्वी दोन घरफोडीचे गुन्हे केले असुन त्यांचेकडुन घरफोडीतील एकुण ८०,०००/-रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर आरोपी यास यापुर्वीच घरफोडीच्या गुन्हयामध्ये अटक केली असुन तो सध्या येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे बंदीवासात आहे. त्यास ताब्यात घेवुन गुन्हयाचा अधिक तपास चिंचवड पोलीस ठाणे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त सो. श्री. विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त सो. श्री. डॉ. संजय शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त सो. श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ श्री. विवेक पाटील, सो, सहा. पोलीस आयुक्त पिंपरी विभाग श्री. सतिश कसबे सो, यांचे मार्गदर्शनाखाली कृष्णदेव खराडे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. प्रकाश जाधव, तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री. नामदेव तलवाडे, पोलीस उप निरीक्षक श्री. शंभु रणवरे, पोलीस अंमलदार सपोफौ जगताप, पोहवा धर्मनाथ तोडकर पोलीस नाईक सचिन सोनपेटे, खंडेराव नलगे, संतोष घंटे, सुभाष पाटील, पोशि रोहीत पिंजरकर, उमेश मोहीते, उमेश वानखेडे, रहीम शेख, पकंज भंदाणे, गोविंद डोके, अमोल माने, गजानन आडके यांनी केली आहे.